

# काय तुम्हांला माहित नाही की युद्ध चालू आहे

**जेम्स स्टीवेन्सन**

मराठी : अश्विनी बर्वे

# काय तुम्हांला माहित नाही की युद्ध चालू आहे







१९४२मध्ये युद्ध सुरु झाले.



माझा भाऊ नौसेनेत भरती झाला.

मी माझ्या आई-
वडिलांबरोबर घरीच
राहिलो.



लोक म्हणत, “काय तुम्हांला माहित नाही की युद्ध चालू आहे?”

बाबा-चार्ली आणि
मी फिल्म
बघायला जाऊ
शकतो का?

तुला माहित नाही की
युद्ध चालू आहे ते?



अरे नाही
परत तेच
जेवण,

तुला माहित
नाही युद्ध
चालू आहे
ते?



मला एक लहान
बहीण हवी
आहे,प्लिज

तुला माहित
नाही की युद्ध
चालू आहे ते?



मी युद्ध जिंकण्यासाठी मदत करण्याचा प्रयत्न केला.



मी अल्युमीनियमची फॉइल
एकत्र केली आणि त्याचा
एक चेंडू तयार केला.



मी टिनचे
डबे वाचवले.



मी रात्री खिडक्यांचे
पडदे लावले कारण
शत्रूला आमचा उजेड
दिसू नाही.



मी युद्ध स्टॅम्प
(तिकिटं) खरेदी केले.

अन्नाची कमी होती, आम्ही
एक "विजय बाग़“ लावली
आणि खूप सारा पालक
उगवला.



तसे तर पालक कोणाला आवडत नव्हता.
त्याची चव चांगली नव्हती.

लोकांनी आपल्या कारच्या विंडशील्ड वर स्टिकर लावले,
जे सांगत होते की ते किती पेट्रोल खरेदी करू शकतात.




अधिकांश लोकांना "A" स्टिकर मिळाले, ज्याचा अर्थ होता की
त्यांना थोडेसे पेट्रोल खरेदी करण्याची परवानगी होती.



जर एखाद्याजवळ
दुसरे कोणते स्टिकर
असेल तर लोक
कुजबुजत की त्याला
ते कसे मिळाले.



मिस्टर हैल्स्टेड हवाई-हमल्याचे वार्डन होते.

त्यांनी आपल्या बाहूवर एक आधिकारिक पट्टी बांधली होती.त्यांच्या हातात टॉर्च होती .ते सगळं व्यवस्थित आहे की नाही हे बघण्यासाठी रात्री गस्त घालत असत की सगळ्या घरांचे दिवे बंद आहे हे बघत. कधी-कधी आपण त्यांना चक्कर मारतांना ऐकू शकत असे.

होशियार! मी हवाई हमल्याचा वार्डन आहे

कोण?

ओह, तुम्ही हैल्स्टेड आहे?

तो लाइट बंद करा.

कोणता लाईट?

वरचा लाइट.

कुठे?
जिन्यावर?
मग मला काहीच दिसणार नाही.

चलो, कोई बात नहीं.



आम्हांला चेतावनी दिली गेली होती की तोड़फोड़ करणारे काही हेर पाणडुबी मधून समुद्राच्या किनाऱ्यावर लपून काही गोष्टी उडून लावू शकत होते.





त्यांना कदाचित वीजेचे संयंत्र आणि रेल्वेचा पूल उडवायचा होता.

मला बरं वाटलं असतं जर त्यांनी चुकून हॉवर्ड जे. डेविस एलीमेंट्री स्कूल उडवून लावले असते तर.





आम्ही लोक म्हातारा सफाई कर्मचारी मिस्टर श्मिटवर नजर ठेवत होतो. ते आम्हांला हेर वाटत होते.

मला माहित नाही-ते संशयास्पदरित्या काम करत नाही ते

बेशक! कारण ते एक हुशार हेर आहेत.



आम्ही त्यांच्या घरापर्यंत पाठलाग केला.



त्यांच्या घरात कदाचित डायनामाइट भरलेलं आहे.

त्यांनी राष्ट्रीय झेंडा सगळ्यांना मूर्ख बनवण्यासाठी लावला असेल.

ते आपल्या रेडीओवर युद्धाच्या बातम्या ऐकत होते.

ते जरूर एक हेर आहेत.

आम्ही मित्र आणि शत्रूच्या विमानांना ओळखायला शिकलो.
ते काम सोप्पं नव्हतं.



मित्र शत्रू मित्र शत्रू

जेव्हा अंधार पडत असे तेव्हा मी आणि माझे मित्र आकाशात शत्रूच्या विमानांवर लक्ष ठेवत असू.




माझे मित्र आपापसात बोलत की ते युद्धात काय करणार.

मी नौसेनाच्या जहाजावर जाईन..

मी एक फाइटर पायलट होईल.

मी शत्रूच्या रेघेच्या मागे पैराशूटचा उपयोग करेल.

मी एका उडणाऱ्या विमानाची बंदुक होईल.



कोणालाच या गोष्टीचा अंदाज नाही की जर त्यांनी मला नौसेनेत येण्याची परवानगी दिली तर मी किती शौर्य गाजवले असते.



सिडनी जवळ जगाचा नकाशा होता. लढाई कुठे होत आहे हे दाखवण्यासाठी तो नकाशाला पिना लावत असे.जर आपण विचारले, ग्वाडल-कॅनाल कुठे आहे?" तर सिडनी म्हणे, “तुला एवढं पण माहित नाही?”



सिडनीला माहित होतं ती सगळी पदकं कशासाठी आहेत.

हे काय आहे सिड?





लीजन ऑफ़ मेरिट! बिलकुल

मौली, डेविड आणि मी मिळून "ब्लैकआउट" नावाचा एक साप्ताहिक पेपर काढला.




त्यात आम्ही सांगितलं की युद्धात आपल्या ओळखीचे कोणत्या लोकांनी भाग घेतला आहे. पण त्यात आम्ही कोणतेही रहस्य सांगितले नाही.

आम्ही माहिती दिली की लोक कुठे रक्तदान करू शकतात. आम्ही पेपर मध्ये पदार्थांच्या रेसिपी पण दिल्या.







एक दिवस वडील म्हणाले,
“चला फिरायला जाऊ या,”
मला खूप मजा आली.
आम्ही खूप कमी वेळा
एकत्र फिरायला जात
असू.

मग वडील मला म्हणाले की ते सेनेत भरती होणार आहे. हे ऐकून मी रडू लागलो. वडिलांनी मला शूर व्हायला सांगितलं.



“मला वाटतं तू आपल्या आईची काळजी घ्यावी,” ते म्हणाले.



मग वडील ट्रेनमध्ये बसून सैन्यात काम करायला निघून गेले.

मी घरात खूप चकरा
मारल्या आणि बघितलं की
वडील काय काय ठेवून गेले
आहेत.



त्यांचं कपाट



त्यांचं डेस्क





त्यांची ब्रीफकेस

ते कपड़े ज्यांची त्यांना
आता बिलकुल गरज
नाही.

आता बाथरूम मध्ये त्यांचा

दाढीचा
ब्रश
नव्हता.





रेजर नव्हते



टूथब्रश नव्हता.



दात घासायच्या
पावडरीचा डबा
नव्हता.



मी माझ्या खोलीत वडिलांचा फोटो ठेवला.
जर मी त्यांची खूप आठवण काढली तर ते
कदाचित युद्धातून जिवंत परत येतील.

आई रोज  युद्धाच्या बातम्या वाचत असे, ती खूप चिंतेत असे.
मला समजत नसे मी तिला कशी मदत करू ते.



जेव्हा आम्ही सिनेमा बघायला जात असू तेव्हा आम्हाला
युद्धाच्या बातम्या बघायला मिळत असत.




त्याचं संगीत भीतीदायक होते, आणि एक नाटकी आवाज सांगे:
शत्रू सेना शक्तिशाली हवाई हल्लाने डगमगत आहे."

एक  ॲडमिरल शहरात आम्हांला सांगायला
येई की आपण युद्ध कसे जिंकू.



ते ॲडमिरल, डेनी रैनकिनच्या आईचे नातेवाईक होते,
आणि मग डॅनी त्यांच्याजवळ उभा राहिला.

आम्हांला कळत
नव्हते की कोणी
ॲडमिरल, डॅनी
सारख्या नटखट
मुलाचे नातेवाईक
कसे असू शकतात?





हिवाळा आला, मग एक दिवस
वडिलांचे एक पत्र आले. त्यांना एक
हॉटेल चालवण्यासाठी फ्लोरिडाला
पाठवले होते.

वडिलांनी लिहले की
शाळेला सुट्टी लागली की
आम्ही फ्लोरिडाला
यायला हवं.

क्या बात आहे !!



त्याला तीन दिवस लागले.ट्रेन सैनिक आणि
नाविकांनी खचाखच भरली होती.





आम्ही खुशनसीब होतो. आम्हांला झोपायला जागा मिळाली.
मी बर्थ वर चढलो आणि झोपल्यावर मी पडदा बंद केला.



मग मी कपडे काढून माझा पायजमा घातला.
त्यानंतर मी कितीतरी स्टेशन गेलेली पाहिली.



शेवटी आम्ही फ्लोरिडाला पोहचलो
आणि ट्रेन मधून उतरलो..



आणि तिथं आमचे वडील होते..




वडीलांनी मला ते काम करत होते तिथं नेलं.
फौजेतल्या जवानांनी तिथं त्यांना सलामी दिली.
त्याचा मला फार अभिमान वाटला.

गरम होत होतं म्हणून आम्ही ख्रिसमसच्या
दिवशी समुद्रात पोहायला गेलो.



आम्ही दर्शनीय स्थळं बघायला गेलो, माझ्या आईवडिलांना फ्लेमिंगो खूप आवडले. मला ते फारसे चांगले वाटले नाही.



अशा खूप गोष्टी होत्या ज्या मला वाटलं की आम्ही पहायला हव्या. पण आईवडिलांना तसं वाटलं नाही.






मग आमची परत जायची वेळ आली.आम्ही विमानतळावर गेलो. “तुम्ही घरी कधी याल?” मी वडिलांना विचारलं. “जसं युद्ध संपेल,” वडील म्हणाले. मला वाटलं ते परत येणार नाही.

आम्ही घरी आलो, युद्ध चालूच होते.



मी जो अल्युमिनियम फॉइल एकत्र केली होती
ती आता एका चेंडू इतकी मोठी झाली होती.



जर्मनीत सैलीच्या भावाच्या हत्ये नंतर आम्ही आमचा
"ब्लैकआउट" पेपर काढणं बंद केलं होतं. आमच्या जवळ
आता सांगण्यासारखे काही उरले नव्हते.

एक दिवस मी हॉर्न, घंट्या आणि लोकांच्या शिट्ट्या ऐकल्या.
मग मी माझी सायकल घेवून शहराच्या चौकात गेलो.




तिथं म्हातारा मिस्टर मर्फी
रस्त्याच्या कोपऱ्यावर आपली टोपी
आणि काठी हलवत होते.
“काय चालू आहे, मिस्टर मर्फी?"
मी विचारलं. “तुला माहित नाही का?
युद्ध समाप्त झालं.” ते ओरडले.
“आपण जिंकलो, आपण जिंकलो!”



तीन आठवड्यानंतर माझा भाऊ घरी आला. त्याच्या नंतर एक महिन्याने आम्ही तिघे वडिलांना भेटायला स्टेशनवर गेलो. वडिलांनी आम्हांला पाहिलं आणि आपला हात हलवला.



तेव्हा मला कळलं युद्ध संपलं.

समाप्त